एस.सी.आर. सर्वोच्च न्यायाल्याचे अहवाल ७५९

चिंतामण राव

विरुद्ध

स्टेट ऑफ मध्य प्रदेश

राम कृष्ण

विरुद्ध

स्टेट ऑफ मध्य प्रदेश

१९५०

नोव्हेंबर ०८

(श्री. हरीलाल कानिया, मुख्य न्यायमूर्ती, मेहर चंद महाजन, मुखर्जी, दास आणि चंद्रशेखर आयर जे.जे.)

*मध्य प्रांत आणि बेरार बिडी उत्पादनाचे नियमन (कृषी हेतू कायदा १९४८ चा एल.एकस.आय.व्ही.) कलम ३ व ४ :- कृषी हंगामात बिडी उत्पादनास प्रतिबंध करणारा कायदा – वैधता – व्यापार किंवा व्यवसाय चालू ठेवण्याच्या मुलभूत अधिकाराचे निर्बंध – निर्बंधांची वैधता – धंदा किंवा व्यवसाय चालविण्याच्या स्वातंत्राच्या मुलभूत अधिकारावर नियंत्रण – नियंत्रणाची योग्यता –*

*योग्यता/माफक्तेची चाचणी – असे नियंत्रण योग्य आहेत की नाही हे ठरविण्याचे न्यायालयाचे कार्यक्षेत्र – भारताचे संविधान १९५० अनुच्छेद १९ (१) (जी), १९ (जी).*

मध्यप्रांत आणि बेरार बिडी निर्मितीचे (कृषी उद्देश) नियमन कायदा (१९४८ चा एल.एकस.आय.व्ही.) हा भारतीय राज्य घटनेच्या प्रारंभी अमलांत असलेला कायदा अशी तरतूद करतो की, उपायुक्त अधिसूचनेद्वारे त्यात निर्दिष्ट केल्या जाणाऱ्या गावांच्या संदर्भात कृषी हंगाम म्हणून कालावाढी निश्चित करू शकतात आणि उपायुक्त सामान्य आदेशाद्वारे, जो तो निर्दिष्ट करेल अशा गावांपर्यंत विस्तारेल, कृषी हंगामात बिडी उत्पादनावर बंदी घालू शकतो. कायद्यात पुढे अशी तरतूद करणेत आली आहे को, अशा आदेशाने निर्दिष्ट केलेल्या गावात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कृषी हंगामात, बिडी उत्पादनात स्वतःला गुंतवू नये आणि कोणत्याही बिडी उत्पादकाने सदर हंगामात बिडी उत्पादनासाठी कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवू नये. या कायद्याच्या तरतुदीनुसार उपायुक्तांनी एक आदेश जारी केला होता ज्यामध्ये काही गावांमध्ये राहणाऱ्या सर्व व्यक्तींना विशिष्ठ हंगामात बिडीच्या उत्पादनात सहभागी होण्यास मनाई करण्यात आली होती. सदर गावांपैकी एका गावात राहणारा बिडी कारखानदार बिडी उत्पादक आणि बिडी कामगाराने संविधानाच्या अनुच्छेद ३२ अन्वये रिट अर्ज दाखल करत सदर कायद्यामुळे त्यंच्या व्यापार किंवा व्यवसाय करण्याच्या, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(२) अनुसार ग्वाही दिलेल्या मुलभूत अधिकारांचा भंग होतो असा आरोप करत तो कायदा अवैध आहे अशी ठरवून मागणारी अज्ञाआर्थक हुकुमाची मागणी केली.

संविधानाच्या अनुच्छेद १९ नुसार हा कायदा रद्दबातल ठरला. सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की,

1) सरसकट बिडी उत्पादन बंद न करता विधी मंडळाला, शेत मजुरांना, बिडी उत्पादनात काम करायला लावण्यास विरोध करून, राज्यातील बिडी उत्पादन क्षेत्रातील, शेतीसाठी पुरेसे शेतमजूर कृषी हंगामात पुरवण्याकमी उपाययोजना करून कायद्याच्या उदेशाची पूर्तता करता आली असती. ज्यार्थी त्या कायद्याच्या तरतुदींचा त्या कायद्याच्या उदेशाशी वाजवी संबंध नव्हता त्यार्थी तो कायदा संविधानाच्या १९(जी) खाली नमूद ‘वाजवी नियंत्रण’ लावणारा नव्हता त्यामुळे तो कायदा अवैध होता.

2) कृषी मजुरांवर बंधने घालण्याच्या हद्दीपर्यंत हा कायदा अधिकार देतो असे जरी म्हटले तरी तो वैध ठरविता येणार नाही कारण त्याची भाषा संविधानाने मान्य केलेल्या मुलभूत अधिकारांवर निर्बंध आणण्याच्या, संविधानाने संमत केलेल्या कायदेमंडळाच्या सिमे आतील आणि बाहेरील निर्बंध त्यात सामील करणारी त्याची भाषा आहे. जोवर संविधानाने नामंजूर केलेल्या उदेशांकारिता त्या कायद्यांचा उपयोग होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही तोवर हा कायदा संपूर्णतः अवैध ठरवावा लागेल.

‘वाजवी निर्बंध’ या वाक्यांशाचा अर्थ असा आहे की, अधिकार उपभोगत असलेल्या व्यक्तीवर लादलेली मर्यादा, मनमानी किंवा अतिस्वरुपाची नसावी, जी जनतेच्या हितासाठी आवश्यक आहे. ‘वाजवी’ हा शब्द बुद्धिमान काळजी आणि विचारविनिमय सूचित करतो म्हणजे तर्काने सुसंगत. ज्या कायद्याने अधिकारांवर मनमानीपणे किंवा अतिरेकीपणे अतिक्रमण केले आहे ते तर्कसंगतेच्या गुणवत्तेस कलंकित कर्ते असे म्हटले जाऊ शकते. आणि जो पर्यंत अनुच्छेद १९(१)(जी) मध्ये हमी दिलेले स्वातंत्र्य आणि अनुच्छेद १९ च्या खंड ६ ने परवानगी दिलेले सामाजिक नियंत्रण ह्यांच्या योग्य संतुलन साधले जात नाही तोपर्यंत त्यात गुणवत्तेचा आभाव असल्याचे मानले गेले पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे की, ‘वाजवी निर्बंध’ म्हणजे काय याचा विधी मंडळाने केलेला निर्णय अंतिम आणि निर्णायक नाही. विधी मंडळाने लादलेले निर्बंध भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ चा खंड ६ प्रमाणे वाजवी आहेत किंवा नाहीत याचा विचार करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे आणि जर त्यांच्या मते निर्बंध वाजवी नसतील तो कायदा अवैध घोषित करण्याचा अधिकार देखील सर्वोच्च न्यायालयाला आहे.

मूळ न्यायक्षेत्र : याचिका क्रमांक ७८ आणि ७९ ऑफ १९५०

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ खाली अज्ञार्थक हुकुम मिळण्याबाबत .

जी.एन. जोशी – याचिकाकर्ता यांचे करिता

एस.एम. सिक्री – उत्तरवादी यांचे करिता

१९५० नोव्हेंबर ०८ न्यायालयाचा निकाल पारित केला.

न्यायमूर्ती महाजन जे. – भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १(जी) अंतर्गत हमी दिलेल्या मुलभूत अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी हे दोन अर्ज मध्य प्रदेश राज्यातील सागर जिल्ह्यातील बिडी उत्पादन संस्थेच्या अनुक्रमे मालक आणि कर्मचाऱ्याने दाखल केलेली आहेत. असे म्हटले जाते की, राज्यात अमलात असलेला, जेथे अर्जदार राहतात त्या गावांसह इतर गावांमध्ये काही गावांमध्ये बिडी उत्पादनावर बंदी घालणारा कायदा संविधानाच्या भाग ३ शी विसंगत आहे आणि तो अवैध आहे. मध्यप्रांत आणि बेरार बिडी उत्पादन नियमन (कृषी उदेश) १९४८ चा एल.एक्स.आय.व्ही. दिनांक १९ ऑक्टोबर १९४८ रोजी त्या प्रदेशाने मंजूर केला आणि राज्यघटनेच्या प्रारंभाच्या वेळी राज्यात हा कायदा अमलात होता. त्या कायद्याच्या कलम ३ आणि ४ मध्ये ह्या अटी आहेत.

"३. त्यात निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा गावांचा संदर्भात उपायुक्त अधिसूचनेद्वारे शेतीचा हंगाम म्हणून कालावधी निश्चित करू शकतात.

४ (१) उपायुक्त सामान्य आदेशाद्वारे जो-तो निर्दिष्ट करेल अशा गावांपर्यंत विस्तारेल, शेतीच्या हंगामात बिडीच्या उत्पादनावर बंदी घालू शकतो.

(२) अशा आदेशाने निर्दिष्ट केलेल्या गावात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने सदरच्या हंगामात बिडीच्या उत्पादनात स्वतःला गुंतवू नये आणि कोणत्याही उत्पादकाने सदर हंगामात बिडीच्या उत्पादनासाठी कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवू नये.

१३ जुन, १९५० रोजी सागरच्या उपायुक्तानी ह्या कायद्याच्या तरतुदीनुसार एक आदेश जारी केला होता, ज्यामध्ये विशिष्ट खेड्यामध्ये राहणाऱ्या सर्व व्यक्तींना बिडी उत्पादनात सहभागी होण्यास मनाई करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांचा धंदा आणि धंद्याच्या स्वातंत्राच्या अधिकारावर विपरीत परिणाम होत असलेने त्या आदेशाचा वैधतेस आव्हान देणाऱ्या या दोन याचिका १९ जून, १९५० रोजी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत या न्यायालयात सदर करण्यात आल्या. याचिका प्रलंबित असताना ३० जून च्या आदेशानुसार नमूद केलेला हंगाम संपला. ०८ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर १९५० या आगामी कृषी हंगामासाठी २९ सप्टेंबर १९५० रोजी त्याच अटींमध्ये नवीन आदेश जारी करण्यात आला. त्या आदेशाला पूरक याचिकेतही आव्हान देण्यात आले होते.

अनुच्छेद १९(१)(जी) खालीलप्रमाणे आहे -

"सर्व नागरिकांना कोणताही व्यवसाय करण्याचा किंवा कोणताही धंदा, व्यापार किंवा उदीम करण्याचा अधिकार असेल"

हा अनुच्छेद धंदा आणि धंद्याच्या स्वातंत्राची हमी देतो तथापि येथे हमी दिलेले स्वातंत्र्य हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ च्या खंड ६ द्वारे लावलेल्या मर्यादेच्या अधीन आहे तो खंड खालीलप्रमाणे आहे.

'उपकलम जी मधील मजकुराचा कोणत्याही अस्तित्वात असणाऱ्या कायद्याच्या परिणामावर, की ज्या अन्वये राज्याने सार्वजनिक जनतेच्या हितासाठी काही वाजवी निर्बंध लावले असतील तर त्यावर काहीही परिणाम होणार नाही किंवा राज्याला असे वाजवी निर्बंध लावण्यापासून अटकाव करता येणार नाही आणि विशेषतः या कलमातील कोणताही भाग अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या, ज्याद्वारे एखाद्या हुकुमतीला एखादा धंदा, व्यवसाय, व्यापार किंवा उदीम सुरु करण्याकरिता आवश्यक व्यावसायिक किंवा तांत्रिक अर्हता  नेमणार एखादा कायदा किंवा नियम केला असेल तर त्याच्या परिणामाला अडथला/परिणाम करणार नाही.

१९४८ चा मध्यप्रांत आणि बेरार कायदा एल.एक्स.आय.व्ही. या बचत कलमाच्या कक्षेत येतो की त्याच्या तरतुदींपेक्षा जास्त आहे हा ह्या अर्जांमध्ये विचारात घेण्यासाठीचा मूळ मुद्दा आहे. याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील असा युक्तिवाद करतात की, अक्षेपित कायदा सामान्य लोकांच्या हितासाठी मुलभूत अधिकारांच्या वापरांवर वाजवी निर्बंध लावत नाहीत तर तो ते पूर्णपणे नाकारतो. ह्या युक्तिवादाची वैधता तपासण्याकरिता विवादित कायदा आणि त्याच्या काही तरतुदींचे परीक्षण करणे आवश्यक आहे. ह्या कायद्याच्या प्रस्तावाने असे म्हटले आहे की, बिडी उत्पादन क्षेत्रामध्ये कृषी हंगामात शेतीच्या कामासाठी, पुरेशा शेतमजुरांचा पुरवठा करण्याकामी

उपाययोजना करण्यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. वर नमूद केलेले कलम ३ आणि ४ उपायुक्तांना बिडी हंगामात बंदी घालण्याचे अधिकार देतात यापैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास त्या कायद्याच्या कलम ७ अन्वये दंड केला जातो, दंड म्हणजे ६ महिनेच्या कालावधीसाठी तुरुंगवास किंवा दंड किंवा दोनीही. अधिक अन्नधान्य वाढविण्याच्या मोहिमेला मदत करण्यासाठी आणि पडीक जमिनीचा बराचसा भाग नांगरणीखाली आणण्याच्या उदेशाने हा कायदा लागू केला.

आमच्या निर्णयाकरिता हा प्रश्न उदभवतो की, सार्वजनिक हित संबंधांचे रक्षण करणेच्या नावाखाली कायदा मनमानीपणे खाजगी व्यवसायात हस्तक्षेप करतो का ? आणि कायदेशीर व्यवसायावर अवास्तव आणि अनावश्यक निर्बंधात्मक नियम लाधतो का ? दुसऱ्या शब्दात, एकूण कृषी हंगामात बिडीच्या उत्पादन व्यासायावर बंदी घालणे हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(जी) मध्ये नमूद केलेल्या मुलभूत अधिकारांवर वाजवी निर्बंध आहेत का ? या तरतुदींचा कायद्याच्या उदेशाशी वाजवी संबंध आहे हे दर्शविल्याशिवाय धंदा आणि धंद्याच्या स्वातंत्र्याच्या अधिकारात कपात करता येऊ शकत नाही.

वाजवी निर्बंध या वाक्यांशाचा 'वाजवी निर्बंध' या वाक्यांशाचा अर्थ असा आहे की, अधिकार उपभोगत असलेल्या व्यक्तीवर लादलेली मर्यादा, मनमानी किंवा अतिस्वरुपाची नसावी, जी जनतेच्या हितासाठी आवश्यक आहे. 'वाजवी' हा शब्द बुद्धिमान काळजी आणि विचारविनिमय सूचित करतो म्हणजे तर्काने सुसंगत. ज्या कायद्याने अधिकारांवर मनमानीपणे किंवा अतिरेकीपणे अतिक्रमण केले आहे ते

तर्कसंगतेच्या गुणवत्तेस कलंकित कर्ते असे म्हटले जाऊ शकते. आणि जो पर्यंत अनुच्छेद १९(१)(जी) मध्ये हमी दिलेले स्वातंत्र्य आणि अनुच्छेद १९ च्या खंड ६ ने परवानगी दिलेले सामाजिक नियंत्रण ह्यांच्या योग्य संतुलन साधले जात नाही तोपर्यंत त्यात गुणवत्तेचा आभाव असल्याचे मानले गेले पाहिजे.

खंड ६ आपल्या अंतिम परिच्छेदात संविधान निर्मात्यांच्या मनात असलेल्या आणि तर्कसंगत्तेची गुणवत्ता असलेल्या निर्बंधांच्या स्वरुपाची काही उदाहरणे स्पष्ट करते ते खंडांच्या व्याखेसाठी मार्गदर्शन करतात आणि कायद्यानुसार खंड जी मध्ये, हमी दिलेल्या स्वातंत्र्यावर लादल्या जाऊ शकणाऱ्या निर्बंधांची व्याप्ती आणि स्वरूप स्पष्ट करतात. हा कायदा कृषी हंगामात अनुच्छेद १९(१)(जी) मध्ये नमूद केलेल्या अधिकाराला पदार्थात आणि परिणामत पूर्णतः निलंबित करतो आणि असे अधिकारांचे पूर्ण निलंबन कृषी व्यवसायाची अशी अव्यवस्था करेल की, तो व्यवसाय संपूर्णतः नष्ट होईल. त्या प्रांतातील बिडी उत्पादन करणाऱ्या क्षेत्रात कृषी क्षेत्रासाठी पुरेश्या कामगारांच्या पुराव्शासाठी उपाययोजना करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. त्या प्रांतातील बिडी उत्पादन क्षेत्रामध्ये कृषी हंगामामध्ये बिडी उत्पादनात कृषी कामगारांच्या रोजगारावर निर्बंध घालणाऱ्या कायद्याद्वारे हे साध्य केले जाऊ शकते. जरी कामाचे तास नियंत्रित केले गेले असले तरी ते वाजवी निर्बंध ठरविले जाऊ शकले असते. अशा कायद्यान्वये, जरी बिडी उत्पादनाकरीता माणसे कामावर लावण्याच्या संख्येवर निर्बंध लावण्यात आले असते आणि त्यांच्या कामच्या तासावर नियंत्रण आणले असते तरी त्यामुळे बिडी उत्पादन पूर्णतः थांबले नसते आणि असा कायदा खंड

जी च्या कक्षेत आला असता तथापि या कायद्यांच्या परिणामांचा दृष्टी समोर असलेल्या उदिष्टांशी कोणताही वाजवी संबंध नाही पण त्याची व्याप्ती इतकी तीव्र आहे की त्या उदेशांपेक्षा खूप जास्त आहे. केवळ कायद्यातील तरतुदीच या खटल्याच्या आवश्यकतेपेक्षा जास्ती नाहीत तर त्यात वापरलेली भाषा देखील बिडी उत्पादकाला कोणत्याही व्यक्तीला त्याच्या व्यवसायात कामावर ठेवण्यास प्रतिबंधित करते मग ती व्यक्ती कोठेही राहत असली तरी दुसऱ्या शब्दात ह्या भागात राहणारा बिडी उत्पादक जिल्हा किंवा प्रांतातील शेजारचे ठिकाणाहून किंवा प्रांताच्या बाहेरील भागातून कामगार आयात करू शकत नाहीत. अशी बंदी मनमानी स्वरुपाची आहे कारण कायदा जो उद्देश साध्य करू इच्छितो त्याचाशी ह्या कायद्याचा कोणताही संबंध नाही त्यामुळे अधिकारांच्या वापरावर वाजवी निर्बंध असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही, पुढे या कायद्यात कृषी हंगामात अधिसूचित गावांमध्ये राहणाऱ्या सर्वच व्यक्तींना बिडीच्या उत्पादनात गुंतण्यास मनाई करण्याचा प्रयत्न केला आहे. हे नाकारता येत नाही की, या गावांमध्ये खूप अशक्त, अपंग खूप मुले, वृद्ध महिले आणि छोटे दुकानदार राहतात जे शेतीच्या मजुरीचे काम करण्यास असमर्थ आहेत. अश्या सर्व व्यक्तींना कायद्याने बिडीच्या उत्पादनात गुंतण्यास मनाई आहे आणि त्यामुळे ते उपजीविकेपासून वंचित राहतात. प्रत्येक गावात राहणारेंचे काही विशिष्ट वर्ग आहेत जे शेतीच्या कामात गुंतलेले नाहीत, ही सर्वसामान्य माहितीची बाब आहे. ते आणि त्यांच्या महिला आणि मुले त्यांच्या मोकळ्या वेळेत बिडीच्या व्यासायात स्वतःला गुंतवून त्यांच्या उत्पन्नात भर घालू शकतात. त्यांना हा धंदा करण्यापासून रोकण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. हा

कायदा जे शेतीच्या कायद्यात गुंतले जाऊ शकतात त्यांना नाकेवळ इतर उप्व्यावसाय किंवा ज्यादा व्यायसाय न करण्यापासून रोखत नाहीत तर ज्या व्यक्तींचा शेतीच्या कामाशी कोणताही संबंध नाही अशा व्यक्तींनादेखील बिडी बनवण्याच्या व्यवसायात सहभागी होणेपासून आणि अशाप्रकारे त्यांची उपजीविका मिळवण्यापासून प्रतिबंधित करते. कायद्यातील ह्या तरतुदी आमच्या मते, अर्जदारांचे हक्कावर 'वाजवी निर्बंध' असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही तसे असल्याने, आणि जरी कृषी मजुरांवर बंधने घालण्याच्या हद्दीपर्यंत हा कायदा अधिकार देतो असे म्हटले तरी, तो वैध ठरविता येत नाही कारण त्याची भाषा संविधानाने मान्य केलेल्या मुलभूत अधिकारांवर आणण्याच्या संविधानाने संमत केलेल्या कायदे मदलाच्या सिमेआतील आणि बाहेरील निर्बंध त्यात सामील करणारी त्याची भाषा आहे. जोवर संविधानाने नामंजूर केलेल्या उद्देशांकारिता त्या कायद्याचा उपयोग होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही तोवर हा कायदा संपूर्णतः अवैध ठरवावा लागेल.

मध्य प्रदेश सरकार तर्फे श्री. सिक्री ह्यांनी असा युक्तिवाद केला की, मध्य प्रदेश विधी मंडळच ह्या कायद्याद्वारे घालून दिलेल्या निर्बंधांचा वाजवीपणा बद्दल योग्य निर्णय घेऊ शाळे असते कारण केवळ तच विधी मंडळाला राज्यात प्रचलित असणारी स्थिती माहिती होती आणि कोणता कायदा लक्ष्य सध्य करू शकतो आणि अधिक अन्न पिक मोहिमेला मदत करू शकतो आणि पडीक जमीन नांगरणीखाली आणू शकतो आणि हे न्यायालय इतक्या दूर अंतरावर बसून, स्वतःच्या अनुमानाच्या मोज व पट्टीवरून, लावलेले निर्बंध हे प्रचलित परिस्थितीनुसार वाजवी होते की नाही, हे ठरवू शकत नाही.

विधी मंडळाचे काय वाजवी निर्बंध आहेत, काय नाही, हे अंतिम किंवा निर्णायक निर्धारण नाही, ते ह्या न्यायालयांच्या देखरेखीच्या अधीन आहे. मुलभूत अधिकारांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायलय, संविधानाने दिलेल्या ह्या अधिकारांचा पहारा देते आणि रक्षण करते आणि हे कर्तव्य पार पडतांना सर्वोच्च न्यायालयाला एखादा कायदा संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचा भंग करत असेल असे दिसून आले तर तो कायदा रद्द करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आमचे मत असे आहे की, आक्षेपित कायदा वाजवीपणाच्या कसोटीवर टिकत नाही आणि त्यामुळे तो अवैध आहे. याचा परिणाम असा आहे की, दिनांक १३ जून, १९४९ व २६ सप्टेंबर, १९५० रोजी उपायुक्ताने जारी केलेले आदेश निरर्थक, निष्क्रिय आणि अप्रभावी आहेत त्यामुळे आम्ही प्रतिवादींना याचिकाकर्त्या विरुद्ध कायद्याच्या कलम ४ मध्ये समाविष्ठ असणाऱ्या तरतुदींची कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी न करण्याचे निर्देश देतो. याचिकाकर्त्यांना दोन याचिकांमध्ये या कार्यवाहीचा त्यांचा खर्च त्यांना मिळेल.

*याचिका मंजूर*

७८ आणि ७९ क्रमांकमधील याचिकाकर्त्यांचा प्रतिनिधी – राजिंदर नारायण

७८ आणि ७९ क्रमांकमधील उत्तरवादींचा प्रतिनिधी – पी.ए. मेहता

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x